Impact Factor – 6.625 | Special Issue - 325 | June 2023 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

**PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# India@75

75 Azadi Ka Amrit Mahotsav

- GUEST EDITOR -

**Dr. O. J. Rasal**
**Mr. S. S. Patel**

- CHIEF EDITOR -

**Dr. Dhanraj T. Dhangar**

- EXECUTIVE EDITORS -

**Mr. H. S. Shaikh**
**Mr. C. M. Gangawane**

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : Academic Book Publications

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 325 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REFREED AND INDEXED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# INDIA @75

... Guest Editor ...

**Dr. O. J. Rasal**

**Mr. S. S. Patel**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Mr. H. S. Shaikh**

**Mr. C. M. Gangawane**

... Jointly Organized by ...

*Pravara Medical Trust's,*

**Arts, Commerce & Science College, Shevgaon**

Dist. Ahmednagar – 414502

***Printed by :*** Academic Book Publications

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 325 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal
Multidisciplinary International E-Research Journal

Printed by

Academic Book Publications

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
E-mail : academicbooksjalgaon@gmail.com
Ph.: (0257) 2235520, 2232800. Mob.: 93092 60560.

**EDITORIAL POLICIES -** Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

ISSN : 2348-7143
June 2023

# : C O N T E N T S :

1. **MSME (Micro, Small, and Medium Enterprises) Business in India** ........ 1
Dr. Mangesh Shirsath

2. **MSME (Micro, Small, and Medium Enterprises) Business in India** ........ 4
Dr. Renuka M. Suryawanshi, Dr. Santosh D. Pawale

3. **Allelopathic effect of Cassia tora on Economic Legumes (Cicer arietinum, Vigna radiata And Glycine max)** ........ 9
Samidha S. Halnar, Harshali R. Dighe

4. **Impact of Covid – 19 on Agriculture** ........ 11
G. M. Bodakhe, R. D. Shelke, R. A. Thombare

5. **Growth Factors and Challenges before Gold Industry in India** ........ 20
Prof. Dr. Sanjay Laxman Argade, Sapna Balkrushna Shahane

6. **Water Pollution and Treatment Method** ........ 22
Jyoti Kadubal Khandagale

7. **Role of Social Media in India** ........ 26
Meherarti Bade

8. **Role of Social Media in India** ........ 29
Varsha D. Dhamale

9. **Artificial Intelligence : The Future** ........ 32
Ashwini Shivajirao Doifode

10. **Effect on Mycorrhizal Fertilizer on Tomato with Respect to Some Morphological and Biochemical Aspect** ........ 37
Sunita Bhagavan Gadekar

11. **Cultural Diversification in Post - Interdependence Period** ........ 40
Hemalata Prakash Joshi

12. **Digital Marketing Trends in India** ........ 44
Komal Ramkrushna Kale

13. **The comparatively study of Nano nanocrystalline Tin Oxide SnO2 & Fluorine doped tin oxide SnO2: F thin films for Solar cell Applications.** ........ 49
B. L. Khatik, G. A. Agale, Dr. R. N. Arle

14. **Management and Utilization of Wells and Borewells in Agriculture Sectoar** ........ 53
Dr. D. B. Kharat, Mr. K. V. Kokare

15. **Role of Microfinance Using Regression Analysis for Women's Economic Empowerment** ........ 55
Mrs. Vanita Suresh Lingayat, Dr. H. S. Lunge

16. **Extraction & Estimation of Chlorophyll from Medicinal Plant** ........ 59
Prof. Yashoda Ramesh Neel

17. **Cloud Computing** ........ 61
Sarita Somnath Raut

18. **A seasonal hematology study in major carps cultured in Ahmednagar district, and effects of probiotic feed on fingerlings growth** ........ 66
Mr. Govind Chandrakant Nikam

19. **Impact of GST on Indian Economy** ........ 77
Prajakta Santosh Sable

20. **Documentation of Some Rare and Endangered Medicinal Plants from Kalsubai - Harishchandragad Wildlife Sanctuary of Ahmednagar District, MS (India)** ........ 80
A. S. Satralkar, B. D. Wagh, S. N. Varpe

21. **Changing Trends in Indian English Literature** ........ 84
Prof. Rameshwar Ganpat Waghmare

22. **A Review on Nanotechnology : Analytical Techniques & Applications** ........ 85
Sonali Bansi Wandhekar

23. **Study of zooplankton diversity in Jayakwadi Dam at Paithan, Dist. Aurangabad, Maharashtra, India** ........ 90
Prof. Ramdas Balu Torade

24. **Indian Economy and Rural Development** ........ 96
Nitin Navnath Zinj

25. **Change in the Indian English Poetry in Pre and Post-Independence Era.** ........ 99
Mr. Chaitany Maruti Gangawane

26. **Redefining Hindu Mythology in Contemporary Indian English Novels with Special Reference to Amish Tripathi's Shiva Trilogy** ........ 105
Sajed Salimoddin Patel, Dr. Ravindra G. Vaidya

27. **Cultural Refluxes in Indian English Fiction : An Overview** ........ 108
Sujata Ashok Gaikwad, Dr. Shrikant Rambhau Susar

28. **A Comparative Study of Indian Farmers on Bamboo Crop in Pre and Post-Independence Era.** ........ 110
Mr. Somnath Dattatray Dhamal, Mr. Ranjeet Anil Tambe

29. **Environment : Sustainable Development** ........ 114
Shital Vinayak Hiwale

30. **Exploring the frontiers of nanotechnology and its implications for the future of Chemistry** ........ 116
Sahil M. Shaikh, Monika B. Khatik, Ismail B. Shaikh and Jayshree K. Khedkar

31. **A study of Mahatma Gandhi's constructive program of rural development**
Dr. Suresh Ramji Dudhkawade

32. **Studies on Biochemical and Histochemical Aspects of Pseudophyllidean Parasite in Fresh Water Fishes from Ahmednagar District (M.S.) India** ........ 124
Mr. Amol Arjun Tathe

33. **In vitro Germination of Pollen Correlation Between Viability (TTC staining) Germinability (In-vitro) of Flowering Plants.** ........ 133
Rahul Bandu Kharat

## मराठी

34. **मराठी साहित्यातील बदलते प्रवाह** ........ 142
प्रा.डॉ. सुनिल विश्वनाथ क्षिरसागर

35. **मराठी साहित्यातील बदलते प्रवाह** ........ 145
डॉ. दत्ताराम राठोड

36. **नटरंग: मराठी कादंबरी ते चित्रपट माध्यमांतर** ........ 149
गणेश एकनाथराव चांदर

37. मानव विकास निर्देशांक आणि भारत ........ 152
अर्चना रामनाथ कानवडे, प्रा.डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे

38. स्थानीय सरकार के गठन और तांतमुक्ति ग्राम अभियान का संबंध ........ 155
बाळासाहेब भानुदास खरात, डॉ. पापली राम

39. मार्क्सचे धर्मविषयक विचार ........ 159
सोपान बाळासाहेब नवथर

40. हिंदी सिनेमा और पटकथा लेखन ........ 161
श्रीकांत भाऊसाहेब शिंदे

41. मराठी साहित्यातील वास्तववादी साहित्यप्रवाह: दलित साहित्य ........ 163
सुधीर किसनराव त्रिभुवन

42. खेडे 75 ........ 166
प्राचार्य हितेंद्र रामरावजी आहेर आणि सहा. प्रा.जयवंत रामदास भदाणे

43. वारकरी कीर्तन संकल्पना स्वरूप ........ 168
प्रा राहुल अशोक भाकरे

44. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीयांची परिवर्तनशील कविता ........ 170
प्रा. ज्योती आनंदराव दिघे

45. हिंदी साहित्य और सिनेमा ........ 172
प्रा. गोरख भोरू इदे

46. महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचाराची सद्यस्थितीतील उपयुक्तता ........ 174
प्रा. महेश शिवाजीराव जाधव

47. आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे बदलते प्रवाह ........ 176
रामदास पंढरीनाथ कातकडे

48. भारतातील टपाल खात्यातील स्थित्यंतरे : काल आणि आज ........ 179
माधवी अशोक मोरे-पिसाळ

49. धूळपावलं कादंबरीतील समाजजीवन ........ 181
प्रा. सुरेश लक्ष्मण नजन

50. शांता शेळके यांचे मराठी माणसाच्या हृदयातील मराठी गीते ........ 183
प्रा. स्मिता मुरलीधर पालेकर (शहाणे)

51. भारताचे परराष्ट्र धोरण आणि संबंध ........ 189
प्रा. मोहन भानुदास परतवाघ

52. गांधी युगातील स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान ........ 193
प्रा. शाहुराव पवार

53. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरवी : जात वास्तव आणि 'फँड्री' ........ 198
प्रा. स्वप्निल भारत रणखांबे

54. आर्थिक विकासात परकीय गुंतवणूकीचे महत्त्व ........ 202
डॉ. एस. बी. पाते, मनिषा किसन सानप

55. सिनेमा और फिल्मांतरण ........ 205
केशव काकासाहेब ससे

56. भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्ष: एक अवलोकन ........ 207
रवी सुभाषराव सातभाई

57. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा एक अभ्यास ........ 210
प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके

58. भारताचे परराष्ट्र धोरणाचे तत्त्वे आणि उद्दिष्टे ........ 212
गणेश शेषराव शेळके

ISSN : 2348-7143
June 2023
RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 325 : India@75

# भारताचे परराष्ट्र धोरणाचे तत्त्वे आणि उद्दिष्टे

गणेश शेषराव शेळके
सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, शेवगाव.

**प्रस्तावना :**

*स्वातंत्र्यापूर्वी साधारण १५० वर्षे भारत ब्रिटिशांच्या आणि त्यापूर्वी अनेक शतके अन्य राजवटींच्या गुलामगिरीत असल्याने स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करू शकला नव्हता. आधुनिक अर्थाने स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून भारताचे अस्तित्व १५ ऑगस्ट १९४७ पासून सुरू झाले. स्वातंत्र्यानंतर देशाची अखंडता, एकात्मता, सुरक्षितता सुनिश्चित करणे हे कोणत्याही केंद्रीय शासनव्यवस्थेचे महत्वाचे कार्य आहे. त्यानंतर नागरिकांच्या मूलभूत भौतिक गरजा भागवून त्यांना सर्वांगीण विकासासाठी सुयोग्य वातावरणाची निर्मिती करणे आवश्यक ठरते.*

या मार्गावर वाटचाल करताना देशाच्या नैसर्गिक आणि मानवी साधनसंपदेच्या मर्यादा लक्षात घेता कोणताही देश पूर्णपणे आत्मनिर्भर असू शकत नाही किंवा तो अन्य देशांपासून पूर्णपणे वेगळा राहू शकत नाही. त्याला आपल्या गरजा, आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी अन्य देशांची मदत घ्यावी लागते. त्यांच्याशी विविध प्रकारची देवाण-घेवाण करावी लागते आणि त्यातूनच आंतरराष्ट्रीय संबंधांचा पाया तयार होतो.

राष्ट्र या संकलपनेचे आकलन करताना भारतीय जनमानसांत प्राचीन भारतीय संस्कृतीच्या विचारांचा मोठा पगडा होता आणि आहे. एके काळी ऐहिक आणि आध्यात्मिक पातळीवर संपन्न असलेली भारतीय संस्कृती परकीयांच्या आक्रमणाने आणि नियंत्रणाने तिचे मोठ्या प्रमाणावर पतन झाले. तिची सर्व बाजूंनी लूट करण्यात आली. शतकानुशतकांच्या विपन्नावस्थेतून १९४७ साली बाहेर आल्यानंतर या महान संस्कृतीच्या पुनरुत्थानाच्या प्रक्रियेला आरंभ झाला आणि आपल्या अंगभूत क्षमतांमुळे ही संस्कृती यथावकाश आपसूकच जागतिक मंचावर आपले अपेक्षित स्थान मिळवेल. अशा भाबड्या आशावादात भारतीय परराष्ट्र व्यवहाराची पायाभरणी झाली. आजही कल्पनेतून आपण पुरते बाहेर आलेलो नाही.

भारताचे परराष्ट्र धोरण शांतता, मानवी हक्क, सुरक्षितता या मुल्ल्यावर आधारलेले आहे. मुळातच सुरुवातीच्याा काळात भारताचे परराष्ट्र धोरण हे आदर्शवादी होते. त्याला कलाटनी मिळाली ती चीनच्या १९६२ च्या भारतावरील आक्रमनानंतर तसेच नंतर सोव्हिएत युनियनचे १९९१ च्या दरम्यान अचानक विघटन झाले. रशियासारखा मित्र कोसळला होता. देशाची परकीय गंगाजळी संपत आल्याने नाईलाजासतव १९९१ साली मिश्र अर्थव्यवस्था सोडून मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारावी लागली होती. खनिज तेलासाठी अवलंबून असलेल्या आखाती देशांत इराक-कुवेत युद्धामुळे अससररता ननमाण झाली होती. अशा परिस्थितीत भारताला आधार वाटला तो आग्नेय आशियाई देशांचा. इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर आदी देश वेगाने प्रगती करत 'एशियन म्हणून नाव कमावत होते. भारताने आपला रोख या देशांच्या 'आसिआन' या संघटनेकडे वळवला आणि 'लुक ईस्ट पॉलिसी' (पूर्वाभिमुख धोरण) राबवणस सुरुवात केली. आणि देशाचे परराष्ट्र धोरण आदर्शवादाकडुन वास्तववादाकडे जाण्यास सुरवात झाली.

केंद्रात २०१४ साली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार अस्तित्वात आल्यानंतर परराष्ट्र व्यवहारांत थोडे नवचैतन्य आल्याचे दिसले खरे, मात्र लवकरचा बाबतीत भ्रमनिरास झालेला जाणवले. मोदींनी यांनी त्यांच्या शपथविधीसाठी शेजारी देशांच्या नेत्यांना आमंत्रित केले होते. पण त्यातील सकारात्मकता पाकिस्तानच्या दहशतवादी हल्ल्यांनी नष्ट केली. मोदींनी पंतप्रधान म्हणून पहिला अधिकृत दौरा केला तो नेपाळचा. पण आज तोच नेपाळ चीनच्या कह्यात जाऊन भारतीय भूप्रदेशावर हक्क सांगत आहे.

गेल्या काही वर्षांत भारताचे परराष्ट्र धोरण काहीसे वास्तववादी होताना दिसते. इतकी वर्षे इस्त्रायलशी चांगले संबंध असूनही तेलपुरवठादार अरब देशांना नाखुश करावे लागू नये म्हणून भारताने इस्त्रायलच्या संबंधांना अधिकृत मान्यता दिली नव्हती. ती आता देण्यात आली. हे थोडे वास्तवात येण्याचे लक्षण. मात्र, परराष्ट्र धोरणातील कल्पनाविलास अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. अलिप्तिवादाची जागा आता 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी'ने (व्यूहात्मक स्वायत्तता) घेतली आहे. म्हणजे सामरीक किंवा व्यूहात्मक निर्णय घेताना अन्य देशांचा दबाव येऊ न देता स्वायत्तपणे निर्णय घेणे. पण, देश जोपर्यंत आर्थिक, औद्योगिक, संरक्षण, संशोधन आणि ऊर्जा आदी क्षेत्रांत स्वयंपूर्ण बनत नाही, तोपर्यंत 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' या संकल्पनेला काही अर्थ नाही. तिच गोष्ट 'सॉफ्ट पॉवर' किंवा 'सौम्यशक्ती'ची. जगात योगसाधनेविषयी कुतुहल वाढले, भारतीय चित्रपट लोकप्रिय होऊ लागले, इडली-वडा अशा दोन-चार भारतीय पदार्थांची नावे ऑक्सफर्ड शब्दकोशात सामील झाली म्हणजे भारताचे युग अवतरले, असे मानण्याची रीत आजकाल पाहावयास मिळते. एकंदर परराष्ट्र व्यवहारात या बाबींचे महत्व मर्यादित आहे, हे समजून घेतले पाहिजे.

**परराष्ट्र धोरण हे मूलत:**

आर्थिक-व्यापारी आणि संरक्षणविषयक हितसंबंधातून आकाराला येत असते. या दोन्ही आघाड्यांवर आज भारत निर्णायक वळणांवर उभा आहे. या संदर्भात भारत आता जे निर्णय घेतो त्यावर त्याचे बऱ्याच अंशी भवितव्य अवलंबून असणार आहे. तेव्हा, निर्णय घेताना तो विचारपूर्वक घेणे आणि एकदा निर्णय घेतला की, अनेक

ISSN : 2348-7143
June 2023

आधाड्यांवर युद्धपातळीवर कामाला लागणे, यावाचून गत्यंतर नाही. तसे करताना फुकाच्या आदर्शवादी संकल्पनांच्या जोखडातून देशाला बाहेर काढण्याबरोबरच वास्तवाची कास धरणे, ही मोठी आव्हाने असणार आहेत.

भारताचा आर्थिक विकास, जागतिकीकरणामुळे वाढणारे आंतरराष्ट्रीय संबंध, वाढणारी संरक्षण दलाची सज्जता आणि वाढता संरक्षण खर्च, व्यापक आकारामुळे हवामानबदलासारख्या विषयांवर पडणारा प्रभाव आणि भारतीय बाजारपेठेत इतर राष्ट्रांना असलेले स्वारस्य यामुळे भारताचे परराष्ट्र धोरण अधिकाधिक व्यापक, किचकट आणि बहुआयामी झाले आहे. कुठल्याही देशाचे परराष्ट्र धोरण राष्ट्रीय हिताच्या व्यापक व्याख्येनुसार तर केले जाते. सामान्य माणसाचे एकत्रित हित जरी राष्ट्र हितानुसार सध्या होणार असले तरीही सामान्य माणूस देशाच्या परराष्ट्र धोरण आलेखन आणि अंमलबजावणीच्या बाहेर असतो. त्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात 'दिल्ली अभी दूर आहे' असे म्हटले तरी काही हरकत नसावी. परंतु तरीही अनेक वेळा परराष्ट्र धोरणे आपल्या दैनंदिन जीवनावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीने प्रभाव पाडत असतात. एखाद्या देशाशी केलेला द्विपक्षीय व्यापाराचा करार आपल्या देशातल्या उद्योग व्यवसायावर आणि रोजगारावर प्रभाव टाकू शकतो. इराणवर आर्थिक प्रतिबंध लावायचे की नाही आणि युद्ध करायचे की नाही यावर पेट्रोल आणि डिझेलचे भाव ठरू शकतात आणि देशातल्या महागाईवर प्रभाव पाडू शकतात. दुसऱ्या पातळीवर पाकिस्तानशी क्रिकेट खेळायचे की नाही आणि चीन समवेत असलेला तिढा कसा सोडवायचा, असे अनेक प्रश्न भारताचे परराष्ट्र धोरण ठरवताना देशाचे नेतृत्व व करणाऱ्या समोर आहेत.

**उद्दिष्टे :**

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.
२. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा भारतीय राजकारणावरील परिणामाचा अभ्यास करणे.
३. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा तत्वांचा अभ्यास करणे.
४. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाचे पंचशील तत्वे:-**

१) पादेशक अखंडता
२) अनाक्मण
३) हस्तक्षेप न करणे
४) शांतता
५) शांततामय सहजीवन

या पाच तत्वावर आधारीत भारताचे परराष्ट्र धोरण आधारीत आहे. आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण स्वातंत्र्य मिळाल्यापासुन आदर्श तत्वावर आधारीत होते. ते अलीकडच्या काळात वास्तविक व व्यावहारीकतेकडे घेऊन जाण्याचे प्रयत्न सुरु असतांना दिसून येते.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलतत्वे:-**

१. राज्याची सार्वभौम समानता
२. वसाहतवाद व वंशभेदाला विरोध करणे.
३. आंतरराष्ट्रीय कायद्यांचा सन्मान करणे व त्यांचे पालन करणे.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाचे तत्त्वे :-**

१) **अलिप्ततेचे धोरण :-** देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच आपल्या देशाने अलिप्ततावादाचे धोरण स्विकारले आहे. भारताच्या परकीय धोरणाने सर्व जगाला प्रभावित केले आहे. अलिप्तता म्हणजे पृथकवाद याचा आंतरराष्ट्रीय राजकारणापासुन वेगळे राहणे. परंतु अलिप्तता म्हणजे निष्क्रीय तटस्थता नव्हे तर योग्य वेळी योग्य बाजुचे समर्थन करणे होय.

२) **वर्णभेद वंशभेदाला विरोध :-** भारताने नेहमीच वर्णभेद, जातिभेद, वंशभेदाला विरोध केला आहे. आफ्रिका व अविकसित राष्ट्रात झालेल्या वर्णभेदाला भारताने कडाडून विरोध केला असून प्रसंगी अशा राष्ट्रावर भारताने आर्थिक निर्बंध टाकले आहेत.

३) **संयुक्त राष्ट्र संघटना व आंतरराष्ट्रीय संघटनाचे समर्थन:-** भारताने वेगवेगळ्या आंतरष्ट्रीय संघटनाचे सदस्तत्व प्राप्त केले असुन त्या संघटनामध्ये सक्रिय भूमिका वठवली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी आर्थिक व सामरीक मदत व सहकार्य केले आहे.

४) **विविध राष्ट्रांशी मैत्रिपूर्ण संबंध:-** भारताने स्वातंत्र्यानंतर आशियाई राष्ट्रांशी व आफ्रिका, युरोप, अमेरीका व सर्वच जागतीक राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

५) **जागतीक शांतता सुरक्षिततेसाठी प्रयत्न करणे :-** भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात जागतीक शांतता व सुरक्षिततेला महत्व दिले आहे.

**भारतीय परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टे :-**

१) **राष्ट्राचे संरक्षण करणे :-** परराष्ट्र धोरण निश्चित करत असतांना राष्ट्राचे संरक्षण करणे हा मुख्य हेतु असतो. राष्ट्राची नैसर्गिक संपत्ती, राज्याची भुमि, नागरिक यांचे संरक्षण करणे हे देशाचे परराष्ट्र धोरणाला करावे लागते. यासाठी सैन्य शक्तिचा उपयोग करने, इतर राष्टांशी तह करणे, चर्चा विनिमयाद्वारे प्रश्न सोडविने अशा विविध मार्गांचा वापर करुन राष्ट्राचे संरक्षण केले जाते.

२) **राष्ट्रीय शक्तिमध्ये वाढ करणे :-** प्रत्येक राष्ट्राला आपल्या शक्तिमध्ये वाढ करण्याच्या दृष्टिने कार्य करावे लागते. परराष्ट्र धोरण योग्य पद्धतीने राबवण्यासाठी शक्तिची आवश्यकता असते. जर राष्ट्राकडे शक्तिचि कमतरता असेल तर त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरन अयशस्वी होण्याची शयक्यता असते. त्यासाठी राष्ट्रे शस्त्रास्रे निर्मिति करणे, संरक्षण करार करणे अशा

विविध मार्गाने आपली शक्ति वाढवतात. भारतानेही अशा विविध मार्गांचा वापर करुन आपली सामरिक शक्ति वाढवली आहे.

३) **आर्थिक विकास :-** परराष्ट्र धोरण ठरवत असताना आपल्या देशाच्या विकासाचे ध्येय साध्य करणे हे प्रत्येक राष्ट्राचे उद्दिष्टे असते. राष्ट्राचा विकास साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या देशाशी व्यापारी करार केले जातात. राष्ट्राचा विकास साध्य होन्यासाठी जागतीक शांतता आवश्यक आहे. त्यासाठी आलिप्ततावादी राष्ट्र जगाला शांतता राखण्याचे आवाहन करतात.

४) **राष्ट्राला प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे :-** जागतिक प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी सर्वच राष्ट्रे प्रयत्नशील असतात. अमेरिका, रशिया या राष्ट्रानी वेगवेगळ्या क्षेत्रात वैज्ञानिक संशोधन करुन व सामरिक वर्चस्व स्थापन करुन तसेच आर्थिक विकास साधून जागतिक महासत्ता बनले आहेत. त्याप्रमानेच भारतानेही जागतीक राजकारणात वेळोवेळी महत्वपुर्ण भुमिका बजावलेली आहे. व त्यामाध्यमातून आपली जागतीक प्रतिष्ठा वाढवली आहे.

५) **सिमा विस्तारास विरोध :-** भारताने सुरवातीपासुनच सिमा विस्तार व इतर राष्ट्रावर आक्रमण करने याला विरोध केला आहे. अनेक साम्राज्यवादी राष्ट्रानी छोट्या व शक्तिहिन राष्ट्रावर आक्रमण करुन त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले होते. त्यामुळे अनेक देशावर गुलामिची वेळ आली होती त्यामुळे भारताने व अलिप्त राष्ट्र समुहाने नेहमीच सीमा विस्तार व हस्तक्षेप यास विरोध केला आहे.

२१ व्या शतकात वाटचाल करत असताना भारताचे परराष्ट्र धोरण हे अधिका अधिक वास्तवीक व व्यावहारीक असणे आवश्यक आहे. त्यासाठी भविष्यकाळाचा वेध घेउन व वर्तमान काळातील जागतीक परिस्थितिचा आढावा घेउन राष्ट्रिय विकासाला पोषक असे परराष्ट्र धोरण आखणे आवश्यक आहे. ज्या मधे सर्वसामान्य भारतीयांचा, शेतकरी वर्ग, मध्यम वर्ग, यांचे हीत सामावलेले असेल.

**संदर्भ :**

१. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण, प्रतीमा प्रकाशन, पुणे.
२. डॉ. वा. भा. पाटिल, भारतीय परराष्ट्र धोरण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
३. अनय जोगळेकर, भारतीच्या परराष्ट्र धोरणाची विस्तारणारी क्षितीजे, परम मित्र पब्लिकेशन, ठाणे.
४. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारतीय परराष्ट्र धोरण - नविन प्रवाह, सकाळ प्रकाशन, पुणे.
५. दैनिक लोकसत्ता - संपादकिय लेख, दि.०६/०७/२०२१
६. दैनिक लोकसत्ता - संपादकिय लेख, दि.१४/०४/२०२३
७. प्रो.व्हि.बी. पाटिल, भारतीय परराष्ट्र धोरण, के सागर प्रकाशन, शनीवार पेठ, पुणे.
८. विकीपिडिया
९. विकासपीडिया
१०. व्ही. पी. दत्त , इंडियाज फॉरेन पॉलिसी सीन्स इंडिपेंड्न्स, एन. बी. टी, प्रकाशन, वसंत कुंज दिल्ली.

●●●